# स्मार्ट ब्रेन करिअर कौन्सिलिंग केंद्राला दिलेल्या भेटीचा अहवाल

- ❖ **भेटीचे ठिकाण : - स्मार्ट ब्रेन करिअर कौन्सिलिंग केंद्र, पनवेल**
- ❖ **केंद्राचे प्रमुख : -  डॉ. दीपक खाडे**
- ❖ **भेटीचा उद्देश : -मार्गदर्शन व समुपदेशन केंद्राला भेट देऊन समुपदेशनाविषयी माहिती मिळवणे.**
- ❖ **भेटीची तारीख : - २ एप्रिल २०२५**
- ❖ **मार्गदर्शक प्राध्यापक : - प्रा. बिजली दडपे**

## अहवाल

मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांतर्गत 'मार्गदर्शन व समुपदेशन' या विषयांतर्गत एका समुपदेशन केंद्राला भेट देऊन समुपदेशन प्रक्रिया जाणून घेण्यासाठी मार्गदर्शक प्राध्यापक बिजली दडपे यांच्या नेतृत्वाखाली ही भेट आयोजित करण्यात आली  ही भेट आम्ही पनवेल मधील दीपक खाडे यांच्या स्मार्ट ब्रेन करिअर कौन्सलिंग केंद्र या ठिकाणी दिनांक 2 एप्रिल 2025 रोजी दिली या भेटीत आम्हाला नवीन नवीन गोष्टींचा अनुभव घेण्यास मदत झाली तसेच अनमोल असे मार्गदर्शन मिळाले.

समुपदेशन केंद्राला दिलेली भेट ही अत्यंत महत्त्वपूर्ण आणि अनुभव संपन्न ठरली. आम्हाला सर्वप्रथम समुपदेशन म्हणजे काय? त्याचे प्रकार आणि गरज याविषयी माहिती देण्यात आली. समुपदेशन केंद्राला भेट दिल्यानंतर असे लक्षात आले की, समुपदेशन हे केवळ हे करिअर क्षेत्राशीच निगडित नसून विवाह, प्रेम, लिव्ह-इन-रिलेशनशीप, वैयक्तिक तसेच सामाजिक समस्या, नैराश्य, तारूण्यावस्थेतील चलबिचल, भविष्य, शिक्षण आणि इतर तत्सम गोष्टींशी सुद्धा संबंधित आहे.

समुपदेशन केंद्राला भेट दिल्यानंतर असे लक्षात आले की, समुपदेशक हा तटस्थ दृष्टीने मार्गदर्शन करून दिशा देणारा व्यक्ती असतो. कारण समुपदेशकाची भूमिका ही एखाद्याच्या समस्येपुढे विधायक ठरू शकते. सध्याच्या काळामध्ये समुपदेशनाची फार गरज आहे. मग ते करिअरच्या बाबतीमध्ये असो किंवा कोणत्या वैयक्तिक अडचणी असतील तरी देखील समुपदेशन घेणे हे उपयोगाचे ठरेल.

स्मार्ट ब्रेन करिअर कौन्सिलिंग केंद्र हे विद्यार्थी व व्यावसायिकांना करिअर मार्गदर्शन, तसेच समाजातील विविध स्तरांवरील व्यक्तींना मनोवैज्ञानिक चाचण्या आणि व्यावसायिक विकासाचे सल्ले देणारे एक प्रमुख केंद्र आहे.

करिअर निवडीच्या टप्प्यावर अनेक विद्यार्थी गोंधळलेले असतात. योग्य समुपदेशनाने त्यांना त्यांच्या ध्येयांबाबत स्पष्टता मिळते आणि योग्य निर्णय घेता येतो. मुलांच्या करिअर विषयी कल ओळखण्यासाठी देखील कौन्सलिंग घेता येते . समुपदेशनाचे हे कार्य डॉ.

Edit with WPS Office

खाडे सर अत्यंत नाजूकपणे हाताळतात आणि योग्य प्रकारे विविध व्यक्तींना मार्गदर्शन करतात.

स्मार्ट ब्रेन करिअर कौन्सिलिंग केंद्र हे विद्यार्थ्यांसाठी, नवोदित व्यावसायिकांसाठी आणि समाजातील विविध स्तरावरील व्यक्तींसाठी एक उत्तम मार्गदर्शन केंद्र आहे. येथे मिळणाऱ्या सेवा अत्यंत उपयुक्त असून, भविष्यात आणखी सुधारणा केल्यास अधिकाधिक लोकांना लाभ मिळू शकेल.

## <u>स्मार्ट ब्रेन करियर कौन्सिलिंग केंद्र, पनवेल येथे समुपदेशक श्री डॉ. दीपक खाडे त्यांच्याशी संवाद साधताना प्राध्यापक बिजली दडपे आणि मार्गदर्शन आणि समुपदेशनाचे सर्व प्रशिक्षणार्थी</u>













Edit with WPS Office

Edit with WPS Office